# कृषि संशोधन केन्द्र

अचलपुर जि. अमरावती (महा.) –४४४८०६

(डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला)

दुरध्वनी : ०७२२३ २२०११९

जा.क्र. कृ.सं.के./अचल./४४३/२०१९

दिनांक: ०६/०८/२०१९

## लिलाव सुचना

कृषि संशोधन केन्द्र, अचलपुर येथील प्रक्षेत्रावरील केळी फळांचा खुल्या लिलाव पदधतीने विकी करावयाची आहे. सदर लिलाव **दिनांक** १३/०८/२०१९ रोजी दुपारी २.०० वाजता कृषि संशोधन केन्द्र, अचलपुर येथील कार्यालयीन सभागृहात आयोजित केला आहे.

लिलावात भाग घेण्यासाठी अटी व शर्ती :

1. लिलावामध्ये प्लॉट क. ०१ मधील झाडावरील केळीची घडे राहतील.
2. कमीत कमी तीन किंवा त्यापेक्षा जास्त बोली बोलणारे असतील तेव्हाच लिलाव पुकारण्यात येईल.
3. बोलीमध्ये भाग घेण्यापुर्वी खरेदीदारांना बोलीत भाग घेण्याकरीता रू १००००/– (रुपये दहा हजार फक्त) रक्कम जमा करावी लागेल. सदर लिलावामध्ये बोली हि क्विंटल प्रमाणे बोलावी लागेल. लिलाव घेतला असेल त्याचे सह प्रथम तीन उच्चतम बोली धारक सोडून इतर सर्वाची रक्कम लिलाव संपताच परत करण्यात येईल. लिलाव घेणाऱ्या व्यतिरिक्त इतर दोन बोली धारकांची रक्कम, लिलाव घेणाऱ्याने पैसे भरताच परत करण्यात येईल. उच्चतम बोली बोलून लिलाव घेणाऱ्याने बोलीची रक्कम न भरल्यास दुसऱ्या क्रमांकाच्या बोली धारकास लिलाव देण्यात येईल व दुसऱ्या क्रमांकाच्या बोली धारकाने बोलीची रक्कम न भरल्यास तिसऱ्या क्रमांकाच्या बोली धारकास लिलाव देण्यात येईल.
4. उच्चतम बोली धारकाने लिलावाचे दिवशी रुपये २००००/- व लिलाव तारखेपासुन ७ (सात) दिवसाचे आत रुपये २००००/- असे एकूण रुपये ४००००/- (रुपये चाळीस हजार फक्त) सुरक्षा ठेव म्हणून भरणा करावी लागेल.. त्याशिवाय फळे तोडता येणार नाही. ज्या दिवशी केळीच्या घडांची तोडणी करण्यात येईल, त्या दिवशी सदर घडांचे वजन करून लिलावात ठरल्या प्रमाणे क्विंटलच्या भावाने आलेली रक्कम कार्यालयास जमा करावी लागेल. म्हणजेच ज्या दिवशी घडांची तोडणी होईल त्या दिवशी क्विंटल प्रमाणे रक्कम कार्यालयास जमा करावी लागेल.
5. फळाची तोडणी करण्याची अंतिम मुदत दिनांक ३१/१०/२०१९ ही राहील. गरज भासल्यास मुदत वाढविण्याबाबत लिलाव कमेटीचा निर्णय अंतिम राहील.

Scanned by CamScanner

6. लिलावाची क्विंटल प्रमाणे अपेक्षित किमंत न आल्यास लिलाव कमेटी लिलाव रद्द करेल.

7. फळे तोडतांना कुठलेही नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल. नुकसान झाल्यास त्याची भरपाई खरेदीदाराकडून करण्यात येईल.

8. लिलावाची अंतिम बोली ग्राहय झाल्यावर संबधीत खरेदीदारास रू १००/— चे जनरल स्टॅम्प पेपरवर करारनामा करून द्यावा लागेल.

9. लिलाव मंजूर झाल्यावर फळबाग राखणीची जबाबदारी, फळांची तोडणी तसेच राखणदाराची राहण्याची व्यवस्था करणे खरेदीदाराकडेच राहील.

10. खते, ओलीत किंवा अन्य कोणतीही मशागत विद्यापीठाचे वेळापत्रकानुसारच केल्या जाईल.

11. कोणत्याही कारणावरून खरेदीदार व केन्द्राचे अधिकारी यांच्यामध्ये वाद निर्माण झाल्यास अंतिम निर्णय हा मा. संचालक संशोधन, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांचा दोघांनाही बंधनकारक राहील.

12. काही कारणावरून बोली बोलणाऱ्यास अपात्र ठरविण्याचा अधिकार लिलाव कमेटीस राहील.

13. संपूर्ण फळे तोडणी झाल्यानंतर लिलाव घेणाऱ्यास सुरक्षा ठेव (Security Deposit) परत मिळण्याकरिता प्रभारी अधिकारी, कृषी संशोधन केन्द्र, अचलपूर या नावाने अर्ज करावा लागेल. व त्यानंतर सुरक्षा ठेव परत करण्यात येईल. सुरक्षा ठेव रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

14. कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास लिलाव कमेटी नुकसान किंमत ठरवेल व सुरक्षा ठेव रक्कमेमधून कपात करण्यात येईल.

15. उच्चतम बोली धारकाने लिलावाचे दिवशी रुपये २००००/- व लिलाव तारखेपासुन ७ (सात) दिवसाचे आत रुपये २००००/- असे एकूण रुपये ४००००/- (रुपये चाळीस हजार फक्त) सुरक्षा ठेव रक्कम भरणा केला नाही तर लिलावामध्ये भाग घेण्याकरीता भरणा केलेली रक्कम रूपये १००००/- परत मिळणार नाही व त्याबाबत कोणताही उजर राहणार नाही व ताबडतोब लिलावाची पुढील कार्यवाही करण्याबाबत लिलाव कमेटी ठरवेल.

16. प्रायोगिक कामाकरीता प्लॉट क्र. ०१ मधील मोठया आकाराची निवडक ५० घडे राखुन ठेवावी लागतील.

प्रभारी अधिकारी
कृषि संशोधन केन्द्र
अचलपूर, जि. अमरावती

Scanned by CamScanner

# कृषि संशोधन केन्द्र

अचलपुर जि. अमरावती (महा.) –४४४८०६

(डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला)

दुरध्वनी : ०७२२३ २२०११९


जा.क्र. कृ.सं.के./अचल./४४५/२०१९

दिनांक: ०६/०८/२०१९

प्रति,

मा. प्रभारी अधिकारी,
कृषी संशोधन माहिती प्रणाली कक्ष,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला

विषय : केळी फळांच्या जाहिर लिलावाची जाहिरात..............

कृषी संशोधन केन्द्र, अचलपूर येथे दिनांक 13/08/2019 रोजी केळी फळांचा जाहिर लिलाव आयोजीत केला आहे. करिता सदर जाहीर लिलावाच्या जाहिरातीचे प्रारूप कृषी विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्याबाबत विनंती करण्यात येते.

प्रभारी अधिकारी
कृषि संशोधन उपकेंद्र
अचलपूर, जि.अमरावती

सोबत : जाहीर लिलावाच्या जाहिरातीचे प्रारूप

Scanned by CamScanner